सबसे 'तेज' ग्लोबल महातेज...!

# ग्लोबल महातेज

स्वागत मूल्य १ रु.

https://epaper.globalmahatej.com/

वर्ष १ ले | अंक : ४६ | सोमवार, दि. १० नोव्हेंबर २०२५ | पाने : ४ | अमळनेर | किंमत : १ रु. | Email - globalmahatej@gmail.com

## दिनविशेष
१० नोव्हेंबर

- शिवाजी महाराजांनी प्रतापगडावर अफझलखानाचा वध केला.
- ईस्ट इंडिया कंपनीने स्थानिक राजाकडून कलकत्ता बंदर विकत घेतले.
- चंद्रशेखर यांनी भारताचे ८ वे पंतप्रधान म्हणून पदभार स्वीकारला.
- गुजरातमधील बडोद्याजवळील वेदसर येथे प्रायोगिक विहिरीत तेलाचा शोध लागला.
- बिल गेट्स यांनी विंडोज १.० प्रकाशित केले.
- शास्त्रीय संगीतातील बहुमोल कामगिरीबद्दल मध्य प्रदेश सरकारतर्फे दिला जाणारा तानसेन सन्मान गायक पं. सी. आर. व्यास यांना जाहीर.
- ज्येष्ठ अणुशास्त्रज्ञ आणि अणुऊर्जा आयोगाचे अध्यक्ष डॉ. आर. चिदंबरम यांची केंद्र सरकारचे मुख्य वैज्ञानिक सल्लागार म्हणून नियुक्ती.
- मंगळावर उतरल्यानंतर पाच महिन्यांत, लँडरशी संपर्क तुटल्यानंतर नासाने फिनिक्स मिशन पूर्ण झाल्याचे घोषित केले.

## शोध अन्न-पाण्याचा..!



*अमळनेर येथील संतश्री सखाराम महाराज वाडी संस्थानानजीकच्या बोरी नदीपात्रात रविवारी दुपारी पिण्याच्या पाण्यासह अन्नाच्या शोधात थवेने विसावलेले बगळे. या बगळ्यांच्या विसावण्याने फुललेले निसर्गाचे मनोहारी दृश्य.* (छायाचित्र : मयूर चौधरी)

## फ्रान्सच्या ट्रेलेने केले हवनावर संशोधन!

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

फ्रान्समधील ट्रेले नावाच्या शास्त्रज्ञाने हवनावर संशोधन केले. ज्यामध्ये त्याला कळले, की हवन मुख्यत्वे आंब्याच्या लाकडावर केले जाते. जेव्हा आंब्याचे लाकूड जळते तेव्हा फॉर्मिक अल्डीहाइड नावाचा वायू तयार होतो. जो धोकादायक जीवाणू आणि विषाणू मारण्याचे कार्य करतो. वातावरण शुद्ध करतो. या संशोधनानंतरच शास्त्रज्ञांना हा वायू आणि तो बनविण्याचा मार्ग कळला.

गूळ जाळला तरी हा वायू तयार होतो. तौतिक नावाच्या शास्त्रज्ञाने हवनावर केलेल्या संशोधनात असे आढळून आले, की जर कोणी अर्धा तास हवनात बसले किंवा शरीर हवनाच्या धुराच्या संपर्कात आले, तर टायफॉइडसारखे घातक आजार पसरवणारे जीवाणूही मरतात आणि शरीर शुद्ध होते. हवनाचे महत्त्व पाहून लखनौच्या नॅशनल



बोटॅनिकल रिसर्च इन्स्टिट्यूटच्या शास्त्रज्ञांनीही यावर संशोधन केले, की हवनामुळे खरोखरच वातावरण शुद्ध होते. जीवाणू नष्ट होतात का ? त्यांनी ग्रंथात नमूद केलेले हवन साहित्य गोळा केले. ते जाळल्यावर तेथील विषाणू नष्ट झाले. मग त्याने वेगवेगळ्या प्रकारच्या धुरावरही काम केले. पाहिले की फक्त एक किलो आंब्याचे लाकूड जाळल्याने हवेतील विषाणू फारसा कमी होत नाही. पण त्यावर अर्धा किलो हवन साहित्य टाकून जाळले असता तासाभरात खोलीतील जीवाणूंची पातळी ९४ टक्के कमी झाली.

एवढेच नव्हे, तर त्यांनी खोलीच्या हवेत असलेल्या बॅक्टेरियाची आणखी चाचणी केली. त्यांना असे आढळून आले, की खोलीचा दरवाजा उघडून सर्व धूर निघून गेल्याच्या २४ तासांनंतरही जीवाणूंची पातळी सामान्यपेक्षा ९६ टक्के कमी होती. वारंवार केलेल्या चाचण्यांनंतर असे आढळून आले, की या एकवेळच्या धुराचा प्रभाव महिनाभर टिकला. ३० दिवसांनंतरही त्या खोलीतील हवेतील विषाणूची पातळी सामान्यपेक्षा खूपच कमी होती. हा अहवाल डिसेंबर २००७ मध्ये एथनोफार्माकोलॉजी २००७ च्या संशोधन जर्नलमध्ये देखील आला आहे. हवनाद्वारे केवळ मानवच नव्हे, तर वनस्पती आणि पिकांचे नुकसान करणारे जीवाणूही नष्ट होतात, असे या अहवालात लिहिलेले होते.

# खड्डे बुजविले, छे..! नुसता थुंकी लावून चिकटविण्याचा प्रकार

## वाहनचालकांचा आरोप; सार्वजनिक बांधकाम विभागाचा दिखावा उघड

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर शहरातील भद्राप्रतीक मॉल ते बजरंग पेट्रोलपंपादरम्यानच्या रस्त्यावरील ( राज्य महामार्ग क्र. ६ ) खड्डे बुजविण्याचे काम नुकतेच करण्यात आले आहे. अमळनेरहून शिरपूर, दोंडाईचा, नंदुरबार असा हा मुख्य प्रवासमार्ग आहे. दररोज शेकडो वाहनांची वर्दळ असलेल्या या रस्त्यावर सततच्या पावसामुळे मोठ्या संख्येने मोठमोठे खड्डे पडले होते. त्यामुळे वाहनचालकांची या रस्त्यावरून ये-जा करताना कसरत होत होती. अनेक लहान-मोठे अपघातही घडले होते.

या पार्श्वभूमीवर काही तरुणांनी पुढाकार घेत स्वतःच खड्ड्यांमध्ये मुरूम टाकला होता. तसेच वाहनचालकांनी सावध राहावे, यासाठी चुन्याने चिन्हेही काढली होती . स्थानिक नागरिकांनीही संताप व्यक्त करीत रस्त्यावर स्वतःहून बॅरिकटस् उभारले आणि वाहतूक सुरळीत ठेवण्याचा प्रयत्न केला होता. मात्र, तरीही सार्वजनिक बांधकाम विभागाकडून याकडे दुर्लक्ष होत होते. याबाबतचे फोटो सोशल मीडियावर व्हायरल झाले. त्यानंतर सार्वजनिक बांधकाम विभागाचे डोळे उघडले आणि तातडीने कार्यवाही करत खड्डे बुजविले. मात्र, हे काम म्हणजे नुसताच थुंकी लावून चिकटविण्याचा प्रकार केला गेला आहे. त्यामुळे परिसरातील नागरिकांसह वाहनचालकांमध्ये संताप व्यक्त होत आहे.

सार्वजनिक बांधकाम विभागाने ज्या पद्धतीने बारीक खडी टाकून खड्डे बुजवले ते नुसतेच औपचारिक स्वरूपात आहेत. काही खड्डे जैसे थेच असून, काहींवरील मुरुम लगेचच निघूनही गेला. त्यामुळे रस्त्यावर पुन्हा खड्डे पडायला सुरूवात झाली आहे. याबाबत वाहनचालकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. काहींनी सांगितले, की खड्डे बुजविण्याचे काम केवळ दिखावा म्हणून करण्यात आले. थोड्याच दिवसांत वाढत्या वाहतुकीमुळे पुन्हा खड्डे तयार होऊन धोकेदायक स्थिती निर्माण होईल. त्यामुळे सार्वजनिक बांधकाम विभागाने याकडे गांभीर्याने लक्ष पुरवून दर्जेदार आणि कायमस्वरूपी खड्ड्यांची दुरुस्ती करावी.

सद्यःस्थितीत थुंकी लावून केलेल्या डागडुजीमुळे व या रस्त्यावरून धावणाऱ्या वाहनांमुळे बारीक मुरुमाची धूळ वाहनचालकांच्या डोळ्यांत जात आहे. या ठिकाणी दुचाकी घसरून अपघात होण्याचीही शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे सार्वजनिक बांधकाम विभागाकडून केलेल्या या वरवरच्या कामामुळे सर्वांचाच प्रचंड रोष आहे.





(छायाचित्रे : रजनीकांत पाटील)

## गर्व से कहो स्वदेशी है हम...! स्वदेशी ही खरिदेंगे हम...!!

**स्वातंत्र्यपूर्व संग्रामातील स्वदेशीची हाक आता पुन्हा देवू या. नवरात्रोत्सवात आपण आदिमाया आदिशक्तीचा जागर करतो त्याप्रमाणेच स्वदेशीचाही जागर करूया..! सच्च्या भारतीयांवर जेव्हा-जेव्हा परकीय आक्रमण होते तेंव्हा-तेंव्हा ते प्रचंड त्वेषाने पेटून उठतात...!! आता तीच वेळ येऊन ठेपली आहे...!!!**

**जय भारत...! जय स्वदेशी...!!**




***अमळनेर येथे छत्रपती शिवाजी महाराज नाट्यगृहात रविवार, दि. ९ नोव्हेंबर रोजी दुपारी ' व्हॉईस ऑफ मीडिया 'च्या पंढरपूर येथे १५ व १६ नोव्हेंबर २०२५ रोजी होणाऱ्या राज्य अधिवेशनाच्या लोगोचे अनावरण करताना जळगाव जिल्ह्याचे पालकमंत्री ना. श्री. गुलाबराव पाटील. शेजारी माजी आमदार श्री. शिरीषदादा चौधरी, व्हॉईस ऑफ मीडियाचे जळगाव जिल्हाध्यक्ष कल्पेश महाले, तसेच जिल्हा उपाध्यक्ष उमेश धनराळे, जिल्हा संघटक जयेशकुमार काटे, जिल्हा प्रसिद्धीप्रमुख बापूराव ठाकरे, साप्ताहिक विंगचे जिल्हाध्यक्ष संजय सूर्यवंशी, जिल्हा उपाध्यक्ष अजय भामरे, शहराध्यक्ष जयंतलाल वानखेडे, उमाकांत ठाकूर यांच्यासह सभासद.***

# ' व्हॉईस ऑफ मीडिया 'च्या पंढरपुरातील राज्य अधिवेशनाच्या लोगोचे अनावरण

## जळगाव जिल्ह्याचे पालकमंत्री ना. श्री. गुलाबराव पाटील यांची उपस्थिति

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

' व्हॉईस ऑफ मीडिया 'तर्फे पंढरपूर येथे १५ व १६ नोव्हेंबर २०२५ रोजी राज्यस्तरीय अधिवेशन होणार आहे. या अधिवेशनाच्या लोगोचा अमळनेर येथील छत्रपती शिवाजी महाराज नाट्यगृहात रविवार, दि. ९ नोव्हेंबर रोजी प्रदेश सरचिटणीस डॉ. डिगंबर महाले यांच्या मार्गदर्शनाखाली मोठ्या उत्साहात अनावरण सोहळा पार पडला. जळगाव जिल्ह्याचे पालकमंत्री ना. श्री. गुलाबराव पाटील यांच्या हस्ते या लोगोचे अनावरण झाले. याप्रसंगी माजी आमदार श्री. शिरीषदादा चौधरी, ' व्हॉईस ऑफ मीडिया 'चे जळगाव जिल्हाध्यक्ष कल्पेश महाले, जिल्हा उपाध्यक्ष उमेश धनराळे, जिल्हा संघटक जयेशकुमार काटे, जिल्हा प्रसिद्धीप्रमुख बापूराव ठाकरे, साप्ताहिक विंगचे जिल्हाध्यक्ष संजय सूर्यवंशी, जिल्हा उपाध्यक्ष अजय भामरे, शहराध्यक्ष जयंतलाल वानखेडे, उमाकांत ठाकूर यांच्यासह सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पत्रकारिता क्षेत्रातील नव्या आव्हानांवर विचारमंथन करणे तसेच पत्रकारांच्या हक्क आणि सन्मानाचे रक्षण करणे हा या अधिवेशनाचा मुख्य उद्देश आहे. या राज्यस्तरीय अधिवेशनात राज्यभरातील प्रिंट, इलेक्ट्रॉनिक आणि डिजिटल माध्यमांतील प्रतिनिधी सहभागी होणार असून, विविध विषयांवरील मार्गदर्शनपर सत्रे, चर्चासत्रे आणि सन्मान सोहळे आयोजित करण्यात येणार आहेत.

# दुग्धाभिषेकाने तरुणाने साजरा केला ' आनंदी घटस्फोट '

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

*लग्न म्हणजे लाखोंचा खर्च आणि गाजावाजा यांच्यासह विधींचा समारंभ, पण काही वेळा लग्नाच्या काही महिन्यांतच घटस्फोटाची वेळ येते. यामुळे कुटुंबांवर सामाजिक आणि भावनिक परिणाम होतात. सध्या सोशल मीडियावर एक व्हिडिओ व्हायरल होत आहे, ज्यामध्ये एक तरुण आपला घटस्फोट आनंदाने साजरा करताना दिसत आहे. या व्हिडिओवर काहींनी त्याला ट्रोल केले, तर काहींनी पुढील आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या. व्हायरल व्हिडीओ आणि ' हॅप्पी डिव्होर्स ' हा व्हिडीओ शेअर केला. त्याने ' हॅप्पी डिव्होर्स ' असे कॅप्शन दिले आहे. व्हिडिओत त्याच्या कुटुंबीयांचाही आनंद दिसतो. तरुणाच्या आईने त्याचा दुग्धाभिषेक केला. तसेच ' हॅप्पी डिव्होर्स ' लिहिलेला केक कापला. केकवर १२० ग्रॅम सोने आणि १८ लाख रोख, असेही लिहिले आहे, जे त्याने घटस्फोटासाठी दिल्याचे सूचित करते. तरुणाचा सकारात्मक दृष्टिकोन बिरादर म्हणतो, की आनंदी राहा, स्वतःचा आनंद साजरा करा. उदास होऊ नका. मी १२० ग्रॅम सोने आणि १८ लाख रोख दिले. आता मी सिंगल आहे, खुश आहे, आझाद आहे. हे माझे आयुष्य आहे. यापुढे माझेच निर्णय चालतील. त्याच्या या सकारात्मक दृष्टिकोनाचे काही नेटकऱ्यांनी कौतुक केले, तर काहींनी घटस्फोट साजरा करण्याच्या पद्धतीवर टीका केली.*

# शिवसेना ' उबाठा 'च्या इच्छुक उमेदवारांची आज मुलाखत

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर नगर परिषदेची निवडणूक शिवसेनेतर्फे (उद्धव बाळासाहेब ठाकरे गट) लढविणाऱ्या इच्छुक उमेदवारांची सोमवार, दि. १० नोव्हेंबर २०२५ रोजी मुलाखत घेतली जाणार आहे.

येथील धुळे रोडवरील शिवांग शॉपिंग कॉम्प्लेक्समधील शिवसेना कार्यालयात सायंकाळी पाच वाजेपासून या मुलाखती घेतल्या जातील. जळगाव जिल्हाप्रमुख तथा जळगावचे माजी उपमहापौर कुलभूषण पाटील, उपजिल्हाप्रमुख नितीन निळे हे मुलाखती घेतील.

इच्छुकांनी आपापल्या प्रभागांतील मतदार, संवर्ग परिस्थिती, समस्या, मागणी आदींची संपूर्ण माहिती घेऊन मुलाखतीसाठी वेळेत उपस्थित राहावे, असे आवाहन अमळनेर तालुकाप्रमुख राजेंद्र मराठे व शहरप्रमुख चंद्रशेखर भावसार यांनी केले आहे.

# धोकेदायक ढाप्यांमुळे नागरिकांच्या जीवाला धोका

## दगडी दरवाजाजवळील स्थिती : अपघाताची शक्यता; प्रशासनाचे दुर्लक्षच!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

शहरातील दगडी दरवाजाजवळ रस्त्याच्या मधोमध ड्रेनेजचा ढापा अतिशय दयनीय अवस्थेत उघड्या स्थितीत आहे. त्यामुळे नागरिकांच्या जीवाला धोका निर्माण झाला आहे. यामुळे तेथे अपघात झाल्यास नेमके कोण जबाबदार? असा प्रश्न वाहनचालकांसह पादचाऱ्यांकडून उपस्थित होत आहे.

शहरातील अंतर्गत वाहतुकीसह चोपडा, यावल, धरणगाव, जळगाव, पारोळा येथून याच मार्गाने दररोज शेकडो अनेक प्रकारची वाहने आणि पादचारी ये-जा करतात. मात्र, रस्त्याच्या मधोमध उघड्या अवस्थेतीह हा ड्रेनेजचा ढापा कोणत्याही क्षणी अपघातास कारणीभूत ठरू शकतो. तो आता पूर्णपणे तुटण्याच्या मार्गावर आहे. त्याचे रूपांतर कधीही थेट मोठ्या खड्ड्यात होऊ शकते. दिवसभरातून अनेक वाहने या ठिकाणी अडखळताना दिसून येतात. याच खड्ड्यानजीक मुख्य रस्त्यासह आजूबाजूला दोन वळणरस्ते आहेत . त्यामुळे हा ड्रेनेजचा ढापा नजरेस न पडता अचानक समोर येतो. त्यामुळे दुचाकीस्वारांचा तोल जातो. अनेकदा वाहने घसरण्याचे प्रकारही येथे घडले आहेत. विशेषतः सायंकाळी, रात्री या ठिकाणी मोठ्या प्रमाणात वाहतुकीची कोंडी होते. जर हा ढापा आणखी तुटल्यास तो पूर्णपणे उघडा होऊन मोठी दुर्घटना घडू शकते.

याबाबत आजूबाजूच्या रहिवाशांसह नागरिकांनी सांगितले, की शहरातील हा मुख्य रहदारीचा रस्ता आहे. प्रशासनासह संबंधित विभागाने तातडीने या ड्रेनेजच्या ढाप्याची दुरुस्ती करून त्यावर मजबूत झाकण बसवावे. अन्यथा कोणत्याही क्षणी मोठा अपघात घडू शकेल. शहरातील प्रमुख मार्गावर असा धोकादायक आणि तुटण्याच्या स्थितीतील ड्रेनेजचा ढापा असणे म्हणजे प्रशासनाच्या निष्काळजीपणाचे द्योतकच म्हणावे लागेल.



(छायाचित्र : विशाल पाटील)

# मसाला पान






ग्लोबल महातेज वृत्तसेवा

थंडीची चाहूल लागली, की लोकरीची आठवण होतेच. उबदार वस्तू, कपडे, पांघरुण, मोजे, टोप्या या लोकरीच्या बनविल्या जातात. लोकरीचे कपडे महाग असतात; पण नीट वापरले तर टिकाऊ असतात. हल्ली पर्यायी प्रकार म्हणून कृत्रिम लोकर बाजारात आहे. ऑरलॉन या कृत्रिम धाग्यांचा वापर त्यात असतो. पण खरी लोकर व तिची ऊब ही वेगळीच.

लोकर ही मुख्यतः मेंढ्यांपासून मिळविली जाते. काही अन्य प्राण्यांची लोकरही जगात वापरतात. पण ते प्राणी व त्यांची लोकर केवळ त्याच भागात वापरली जाते. लामा, याक ही त्यांची काही उदाहरणे. लोकर म्हणजे एक प्रकारचा केसासारखाच धागा असतो. पण हा धागा मुळापासून काढल्यानंतरही म्हणजे मृत झाल्यावरही स्थितिस्थापकत्व राखू शकतो. हवेतील आर्द्रता, पाणी, शरीरातील घाम यांना शोषून घेणे व गरजेप्रमाणे पुन्हा आपोआप कोरडे होणे हा लोकरीचा प्रमुख गुण. त्यामुळेच पावसाची भुरभुर असताना लोकरीचा स्वेटर अंगात असेल, तर वेळ निभावून जाते व स्वेटर आपोआप वाळत जातो. दुसरा लोकरीचा प्रमुख गुण म्हणजे मूळ आकार पुन्हा मिळविणे. त्यामुळे ताणली, दाबली, चुरगाळली, तरी लवकर शक्यतो मूळ आकार घेते. घाण, धूळ, माती, तेलकटपणा यापासूनही लोकरीचे कपडे झटकन सोप्या रीतीने स्वच्छ होऊ शकतात. या सर्व गुणांमुळेच लोकर आजही स्वतःची मागणी टिकवून आहे. ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंड येथील मरीनो जातीच्या मेंढ्या आणि दक्षिण आफ्रिका व अर्जेंटिना येथील मेंढ्या ही जगातल्या लोकर पैदाशीची प्रमुख साधने. पश्मीना जातीच्या मेंढ्याही याला उपयुक्त असतात. त्यांचा धागा खूप लांब, चिवट व पाहिजे त्या जाडीचा काढता येतो. मेंढीची लोकर यांत्रिक कात्रीने कापून पाण्यात भिजवून मग वाळवतात. एका मेंढीची लोकर शक्यतो सलग एकाच गठ्ठ्याप्रमाणे काढली जाते. हिवाळ्यानंतर हा प्रकार करतात म्हणजे पुढच्या हिवाळ्यापर्यंत मेंढी पुन्हा स्वतःचे संरक्षण करू शकते.

कापलेली लोकर कार्डिंग मशिनवर कातून तिचे जाड दोर वळले जातात. त्यांना रंग देऊन व त्यांच्यावर प्रक्रिया करून मग योग्य तो ताण देत, पीळ देत त्यापासून लोकरीचे गुंडे बनविले जातात. कापड विणायचे असले, तर लोकरीबरोबर थोडाफार सुताचा वापरही केला जातो. लोकरीला दिलेला रंग पक्का असतो व त्यामुळे तिला चकाकी येते. लोकरीचा कपडा अंगावर घातला, की तिच्यातील धाग्यांमध्ये अडकून राहिलेली हवा हीच मुळी मुख्यतः आपल्या शरीरावरील ऊब व बाह्य गारवा यांमध्ये इन्सुलेशनप्रमाणे काम करते. त्यामुळे निर्माण झालेली ऊब टिकून राहते. चहाच्या किटलीवर टिकोझी यासाठीच घालतात. लोकरीच्या कपड्यांना ते टोचू नयेत म्हणून आतून मऊ अस्तर लावण्याची ही पद्धत आहे.

लोकरीचे कपडे वापरण्याचा काळ हा वर्षांतील थंडीचा काळ एवढाच असतो. अन्य वेळी ते ठेवून दिले जातात. लोकर खाणारे एक प्रकारचे किडे हे कपडे कुरतडतात. त्यामुळे हे कपडे ठेवताना नेहमीच कीटकनाशक औषधांचा वापर आवश्यक ठरतो. अन्यथा हवाबंद कपाटात कपडे ठेवावे लागतात. या प्रकारच्या किड्यांना कसर जातीचे किडे म्हणतात. चकचकीत, लहान, झपाट्याने हालचाल करणारे हे किडे खास करून लोकरीवरच वाढतात. लोकरीचे स्वेटर, शाली हाताने विणणे हे काम जगभराच्या स्त्रिया कलाकुसरीने व आवडीने करत आल्या आहेत. या क्षेत्रात आता यांत्रिक पद्धतीने जरी काम होत असले, तरीही आवडीच्या व्यक्तीने विणलेला स्वेटर जास्त आवडीने वापरला जातो, याला यानंतरही बाधा येईल, असे वाटत नाही.

## पक्षी सप्ताहातच २२५ दुर्मिळ पक्ष्यांची शिकार उघडकीस

ग्लोबल महातेज वृत्तसेवा



अरण्यऋषी व पद्मश्रीने सन्मानित दिवंगत मारुती चितमपल्ली आणि पक्षीतज्ज्ञ डॉ. सलीम अली यांच्या जयंतीनिमित्त महाराष्ट्रात ५ ते १२ नोव्हेंबर दरम्यान पक्षी सप्ताह साजरा केला जातो. मात्र याच पक्षी सप्ताहात दुर्मिळ पक्ष्यांची शिकार केल्याचे प्रकरण उघडकीस आल्याने सर्वत्र संतापाचे वातावरण आहे. राज्यातील जैवविविधतेचे संरक्षण व संवर्धन यादृष्टीने निसर्गातील प्रत्येक घटकाचे महत्त्व विशद व्हावे, लोकजागृती व्हावी, या उद्देशाने तसेच पक्ष्यांचे निसर्गातील महत्त्व, संकटग्रस्त धोकाग्रस्त पक्षी व त्यांचे अधिवास, पक्ष्यांचे स्थलांतर आणि त्यांच्या अधिवासाचे संरक्षण, पक्षी संरक्षण व संवर्धन कायद्याविषयीची माहिती सर्वसामान्य नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी ५ ते १२ नोव्हेंबर हा आठवडा पक्षी सप्ताह म्हणून साजरा करण्याबाबत २७ ऑक्टोबर २०२० रोजी शासनाने आदेश काढला. मात्र आता शासनालाच या पक्षी सप्ताहाचे गांभीर्य राहिलेले नाही. नागपुरात मुख्यालय असताना गेल्या तीन दिवसांत एकही कार्यक्रम आयोजित करण्यात आला नाही. तर नुकतेच आता पक्ष्यांच्या शिकारीचा प्रकार उघडकीस आला.

चंद्रपूर जिल्ह्यातील सावली वनपरिक्षेत्रात हा प्रकार उघडकीस आला. व्याहाड उपवन क्षेत्रातील मौजा उमरी लगतच्या तलावात रेशाळ कंठाची भिंगरी (स्ट्रीक थ्रोटेड स्वालो) या संरक्षित प्रजातीच्या पक्ष्यांची शिकार करणाऱ्या आरोपींना अटक करण्यात आली. हे चारही आरोपी गडचिरोली जिल्ह्यातील असून, लोमेश धोंडू गेडाम, प्रताप बालाजी जराते, अरविंद धोंडू गेडाम, मुखरू सखाराम मेश्राम अशी त्यांची नावे आहेत. शुक्रवारी, ७ नोव्हेंबरला पहाटे उमरी तलाव परिसरात वनकर्मचारी पक्षी निरीक्षण करत असताना त्यांना काही संशयास्पद हालचाली दिसून आल्या. वन खात्याच्या पथकाने त्या ठिकाणी धडक देताच शिकाऱ्यांनी पकडलेल्या पक्ष्यांचा मोठा साठा त्यांच्याकडे आढळला. वन खात्याने मुद्देमालासह चौघांनाही ताब्यात घेतले. वन्यजीव संरक्षण अधिनियम १९७२ च्या कलम ९, ३९, ४९, ५०, ५१ अन्वये त्यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. विभागीय वनाधिकारी राजन तलमले, सहाय्यक वनसंरक्षक विकास तरसे यांच्या मार्गदर्शनाखाली वनपरिक्षेत्र अधिकारी विनोद धुर्वे पुढील तपास करत आहेत.

वन विभागाच्या पथकाने शिकाऱ्यांकडून शिकारीसाठी वापरलेले आठ जाळे, पाच पिशव्या, नायलॉन दोऱ्या, १६ बांबू काठ्या, ८ लाकडी खुंट्या, २ दुचाकी वाहने तसेच सुमारे २२५ मृत पक्षी जप्त केले. ही कारवाई वनपरिक्षेत्र अधिकारी विनोद धुर्वे, वनक्षेत्र सहाय्यक अनंत राखुंडे, वनरक्षक महादेव मुंडे, भोलेश्वर सोनेकर, एकनाथ खुडे, आर. एस. डांगे, स्थानिक प्राथमिक प्रतिसाद दल, कक्ष मदतनीस यांच्या संयुक्त पथकाने केली.

## ' ब्रेक फ्री स्टोरीज ' च्या महिलांची गोष्ट का आहे खास?

ग्लोबल महातेज वृत्तसेवा



' ब्रेक फ्री स्टोरीज ' या ग्रुपमधील महिलांची गोष्ट ही खास आहे. कारण हा ग्रुप घटस्फोटित महिलांना समाजात नवी दिशा आणि आत्मसन्मान मिळवून देण्यासाठी एक वेगळा मंच उभा करतो. हा ग्रुप केवळ सांत्वन पुरविणे इतक्यापुरता मर्यादित नाही, तर महिलांना स्वतःच्या दुःखावर मात करण्यासाठी, एकमेकांना आधार देण्यासाठी आणि नव्या अध्यायाला सरूवात करण्याची प्रेरणा देतो.

**ग्रुपची स्थापना आणि उद्दिष्ट**

- ' ब्रेक फ्री स्टोरीज ' या उपक्रमाची सुरूवात राफिया अफी यांनी केली.
- यामध्ये घटस्फोटित, विभक्त किंवा एकट्या राहणाऱ्या महिलांसाठी विशेष कार्यशिबिरे, ऑनलाईन सत्र आणि ग्रुप ट्रिप्स आयोजित केल्या जातात.
- या सत्रांमधून महिलांना आपली कहाणी निर्भीडपणे मांडता येते आणि मानसिक, सामाजिक बळ मिळते.

**महिलांच्या अनुभवांची वेगळेपण**

- प्रमाणित सामाजिक रूढींपासून वेगळ्या धाटणीने या महिलांचा समूह आपला दुःख साजरा करण्याऐवजी त्यावर उपचार आणि सक्षमीकरणाकडे वाटचाल करतो.
- या गटातील महिला एकमेकींबरोबर अनुभव शेअर करतात, सामाजिक न्यूनगंडावर मात करतात आणि पुन्हा जगायला शिकतात.
- ' ब्रेक फ्री स्टोरीज ' या मंचामुळे अनेक महिलांनी आपले स्वातंत्र्य आणि स्वतःचा आत्मसन्मान पुन्हा मिळविला आहे.

**विशिष्ट महत्त्व**

- हा उपक्रम महिला सक्षमीकरणाच्या दिशेने एक प्रेरणादायी पाऊल आहे.
- घटस्फोट किंवा विभक्त होणे हा कलंक नसून, नव्या जीवनाच्या संधीचा आरंभ आहे हे या उपक्रमामुळे अधोरेखित होते.
- समाजात जो समर्थनाचा अभाव असतो, तो हा ग्रुप भरून काढतो आणि महिलांना एक ' भागिनी चळवळ ' अनुभवता येते. ' ब्रेक फ्री स्टोरीज 'च्या गटात सहभागी होणाऱ्या प्रत्येक महिलेला स्वतःला नव्याने शोधता येते. त्या मिळविलेल्या नवी दिशा समाज परिवर्तनासाठीही उपयुक्त ठरते.

## क्रिकेटचे मूळ अन् समृद्ध इतिहास!

ग्लोबल महातेज वृत्तसेवा



क्रिकेट असा खेळ आहे, की ज्याची मुळे आता खोलवर रुजली आहेत. क्रिकेटचा एक समृद्ध इतिहास आहे. शतकानुशतके विकसित होऊन तो जगातील सर्वांत लोकप्रिय खेळांपैकी एक बनला आहे. क्रिकेटचा सर्वांत जुना उल्लेख इंग्लंडमध्ये १६ व्या शतकात आढळतो. हा खेळ प्रामुख्याने ग्रामीण मनोरंजनाचा होता. परंतु लंडनमध्ये तो लोकप्रिय होऊ लागला जेथे संघटित सामने होऊ लागले.

दशके उलटत गेली तसतसे क्रिकेटचा खेळ विस्तारत गेला. दक्षिण आफ्रिका, वेस्ट इंडिज, न्यूझीलंड आणि भारत हे देश कसोटी खेळणाऱ्या देशांच्या यादीत सामील झाले. सध्याच्या काळात क्रिकेट हा सर्वांत लोकप्रिय आणि अनुयायी असलेल्या सांघिक खेळांपैकी एक आहे. त्याचे शंभराहून अधिक सदस्य देश आहेत.

सचिन तेंडुलकरला ' क्रिकेटचा देव ' म्हटले जाते. त्याचप्रमाणे विल्यम गिल्बर्ट ग्रेस यांना क्रिकेटचे जनक म्हणून ओळखले जाते. त्यांना ही प्रतिष्ठित मान्यता आहे. १८ जुलै १८४८ रोजी इंग्लंडमधील ब्रिस्टल येथे जन्मलेले डब्ल्यूजी ग्रेस यांना क्रिकेटच्या इतिहासातील सर्वांत महत्त्वाच्या व्यक्तींपैकी एक मानले जाते. त्यांचा खेळावरचा प्रभाव खोलवर आणि प्रभावशाली आहे. डब्ल्यूजी ग्रेस यांचा जन्म एका क्रिकेटप्रेमी कुटुंबात झाला. त्यामुळे त्यांनी अगदी लहान वयातच क्रिकेट खेळायला सुरूवात केली. त्यांची क्रिकेट कारकीर्द १८६० ते १९०० च्या दशकाच्या सुरूवातीपर्यंत चार दशकांहून अधिक काळ चालली. ज्या काळात ते इंग्लंड, ग्लॉस्टरशायर आणि इतर विविध संघांकडून खेळले.

ग्रेस हा एक अष्टपैलू खेळाडू होता. मात्र त्याच्या फलंदाजीनेच खेळात खऱ्या अर्थाने क्रांती घडविली. ग्रेसची फलंदाजीची तंत्रे आणि शैली त्याच्या काळाच्या पुढे होती. त्याने खेळात पूर्वी न पाहिलेली अॅथलेटिकिझम, तंत्र आणि कौशल्याची पातळी आणली. ग्रेसने त्याच्या प्रथम श्रेणी कारकीर्दीत ५४ हजारांहून अधिक धावा केल्या आणि २,८०० हून अधिक विकेट्स घेतल्या. या कामगिरीतून त्याची महानता दिसून येते. डब्ल्यूजी ग्रेसच्या क्रिकेटमधील योगदानामुळे त्याला ' क्रिकेटचे जनक ' ही पदवी मिळाली, हे वेगळे सांगायला नको. त्याचा वारसा क्रिकेटपटू आणि चाहत्यांना प्रेरित करत आहे.

## डॉलर वाली सैलरी छोड़ सिविल सर्विस पर आया दिल लाखों की नौकरी ठुकराकर ' आयपीएस ' बनीं पूजा यादव



### सक्सेस स्टोरी

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

यूपीएससी सिविल सर्विस परीक्षा का जुनून क्या होता है, यह आयपीएस पूजा यादव की प्रेरणादायक यात्रा से समझा जा सकता है। इस कठिन परीक्षा को क्रैक करने के बाद वे IPS अधिकारी बनीं और अपने सख्त और प्रभावी कामकाज से देशभर में मशहूर हो गईं। लेकिन उनका सफर आसान नहीं थाइसमें संघर्ष, असफलताएँ और दृढ़ संकल्प की कहानियाँ भरी पड़ी हैं। आइए जानें, कैसे विदेश की चकाचौंध भरी जिंदगी छोड़कर उन्होंने देश सेवा का सपना साकार किया।

**कौन हैं पूजा यादव?**

हरियाणा के नूह जिले से ताल्लुक रखने वाली पूजा यादव एक मध्यमवर्गीय परिवार से हैं। २० सितंबर १९८८ को जन्मीं पूजा बचपन से ही पढ़ाई में अव्वल रहीं। उन्होंने अपनी प्रारंभिक शिक्षा हरियाणा से पूरी की, उसके बाद बीए की डिग्री हासिल की। राजनीति विज्ञान में एमए करने के बाद उन्होंने बायोटेक्नोलॉजी और फूड टेक्नोलॉजी में एमटेक की पढ़ाई पूरी की।पढ़ाई पूजा का जुनून था, लेकिन आर्थिक तंगी ने उनके रास्ते में कई बाधाएँ खड़ी कीं। एमटेक और यूपीएससी की तैयारी के दौरान उन्होंने बच्चों को ट्यूशन पढ़ाकर और रिसेप्शनिस्ट की नौकरी करके अपने खर्चे निकाले। यही उनका संघर्ष उनकी कहानी को इतनी प्रेरणादायक बनाता है।

**विदेश की नौकरी और सिविल सर्विस का सपना**

एमटेक पूरा करने के बाद पूजा को विदेश में अच्छी नौकरी मिल गई। वे कनाडा और जर्मनी में रिसेप्शनिस्ट के रूप में काम कर चुकी हैं, जहाँ लाखों का पैकेज और विदेशी जीवनशैली उनके सामने थी। लेकिन पूजा का दिल देश सेवा में था। उन्होंने महसूस किया कि विदेश में काम करके वे दूसरे देश के विकास में योगदान दे रही हैं, जबकि उनका सपना भारत की सेवा करना था।इसलिए, उन्होंने उच्च वेतन वाली नौकरी छोड़ दी और २०१७ में भारत लौट आईं।

यूपीएससी परीक्षा की तैयारी शुरू की, लेकिन पहले प्रयास में सफलता नहीं मिली। हार मानने के बजाय, उन्होंने दोगुनी मेहनत की। २०१८ में दूसरे प्रयास में उन्हें ऑल इंडिया रैंक (AIR) १७४ मिली और गुजरात कैडर में IPS अधिकारी के रूप में चयनित हुईं।वर्तमान में, पूजा यादव गुजरात के राजकोट शहर में डीसीपी (ट्रैफिक) के पद पर तैनात हैं। वे ट्रैफिक नियम उल्लंघन करने वालों के खिलाफ सख्त कार्रवाई के लिए जानी जाती हैं।

सोशल मीडिया पर भी सक्रिय पूजा के इंस्टाग्राम पर 3 लाख से अधिक फॉलोअर्स हैं, जहाँ वे जनता से जुड़ाव और जागरूकता फैलाने का उपयोग करती हैं।

**निजी जीवन : आयएएस से शादी**

पूजा की शादी २०१६ बैच के IAS अधिकारी विकल्प भारद्वाज से १८ फरवरी २०२१ को हुई। दोनों की मुलाकात मसूरी के लाल बहादुर शास्त्री नेशनल अकादमी ऑफ एडमिनिस्ट्रेशन में हुई थी। विकल्प मूल रूप से केरल कैडर के अधिकारी थे, लेकिन शादी के बाद उन्होंने गुजरात कैडर में स्थानांतरण करवाया। यह जोड़ा सिविल सर्विसेज की दुनिया में एक प्रेरणास्रोत है।पूजा यादव की कहानी बताती है कि सच्चा जुनून और मेहनत किसी भी बाधा को पार कर सकती है। अगर आप भी यूपीएससी या किसी लक्ष्य की ओर बढ़ रहे हैं, तो उनकी यात्रा आपको प्रेरित करेगी ।



**मराठी चित्रपटसृष्टीतील प्रसिद्ध कलाकारांचे विनोदी किस्से..**

**लक्ष्मीकांत बेर्डे ' शूटिंगमधला गोंधळ '**

' धुमधडाका 'च्या सेटवर एकदा डायरेक्टर म्हणाले, की बेर्डे, ही सीन सीरियस आहे.
बेर्डे म्हणाले, की सीरियस मी नाही. हसवणे माझे धर्मकार्य आहे.
सीनमध्ये एवढे हसू आले, की डायरेक्टरलाच पुन्हा टेक द्यावा लागला.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :- आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7011004040, 7011004242, ई-मेल : globalmahatej@gmail.com

# पंचायत समिती कार्यालयात स्वच्छतेचा बोजवारा

## स्वच्छतागृह, शौचालयांची दयनीय अवस्था, आरोग्याला धोका!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : स्वच्छ भारत अभियान, ग्रामविकास आणि सार्वजनिक आरोग्य आदी विविध योजनांवर लाखो रुपये खर्च केले जातात. मात्र, या बाबी फक्त कागदावरच राहातात की काय? असा प्रश्न उपस्थित होत आहे. येथील पंचायत समिती कार्यालयाची स्वच्छतागृहांची अवस्था अत्यंत दयनीय झाली आहे. पंचायत समिती कार्यालयात विविध कामांसाठी येणारे नागरिक व कर्मचाऱ्यांचेही आरोग्य यामुळे धोक्यात आले आहे. याकडे संबंधित विभागाने लक्ष देण्याची मागणी नागरिकांनी केली आहे. तालुक्यातील शेकडो नागरिक विविध शासकीय कामांसाठी पंचायत समितीत येतात. मात्र, सोयी– सुविधांचा पूर्णतः अभाव आहे. स्वच्छतागृहांचे दरवाजे तुटलेले आहेत. पाणीपुरवठा बंद आहे. नियमित साफसफाई होत नाही. गटारींचा निचराही होत नाही. परिणामी दुर्गंधीने नागरिक हैराण होतात.

नागरिकांना उघड्यावर लघुशंकेस जावे लागते. दैनिक ग्लोबल महातेच्या प्रतिनिधींनी पाहणी केली असता कार्यालयाच्या परिसरात अस्वच्छतेचा बोजवारा असल्याचे दिसून आले. महिलांसाठी तर कुठलीही सुविधा उपलब्ध नाही. पंचायत समिती हे ग्रामविकासाचे केंद्र आहे. मात्र, शौचालयांची दूर्दशा पाहून येथे कार्यालय आहे, की उकिरडा असा प्रश्न पडतो.

काही समाजसेवी संघटनांनी या परिस्थितीचा तीव्र संताप व्यक्त करुन निषेध नोंदविला आहे. स्वच्छता हेच विकासाचे पहिले पाऊल याचे भान ठेवणे गरजेचे आहे. पंचायत समितीसारख्या सरकारी कार्यालयातच जर स्वच्छतेचा बोजवारा असेल, तर ग्रामपातळीवरील स्वच्छता मोहिमेवर नागरिकांचा विश्वास कसा बसेल, असा प्रश्न आहे. संबंधित अधिकाऱ्यांनी या समस्येकडे तातडीने लक्ष देऊन स्वच्छतागृहांची दुरुस्ती करावी. नियमित साफसफाईची व्यवस्था करावी. परिसरात स्वच्छतेचा आदर्श निर्माण करावा, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. अन्यथा येत्या काही दिवसांत स्वच्छता मोहिमेवर घेण्यात येणाऱ्या बैठका व घोषणांचा केवळ दिखावा असल्याची भावना जनतेत निर्माण होईल, यात शंका नाही.



(छायाचित्र : रजनीकांत पाटील)

# पैसे नसल्यामुळे आता शिक्षण थांबणार नाही



## घरबसल्या मिळेल बिनव्याजी कर्ज; सरकारची योजना

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

आजही देशात असे अनेक विद्यार्थी आहेत, की ज्यांना पैशांअभावी त्यांचे शिक्षण थांबवावे लागते. मात्र आता या विद्यार्थ्यांना ते करावे लागणार नाही. अशा गरीब विद्यार्थ्यांना मदत करण्यासाठी भारत सरकारने एक नवीन योजना सुरू केली आहे. या योजनेंतर्गत भारत सरकार विद्यार्थ्यांना शैक्षणिक कर्ज देते. या योजनेंतर्गत कोणते विद्यार्थी शैक्षणिक कर्जासाठी पात्र आहेत? कर्जाची रक्कम किती आहे? व्याज अनुदान किती उपलब्ध आहे? याबद्दल जाणून घेऊया.

या योजनेला प्रधानमंत्री विद्या लक्ष्मी योजना म्हणतात. प्रधानमंत्री विद्या लक्ष्मी योजनेंतर्गत सरकार दहा लाखांपर्यंतचे शैक्षणिक कर्ज देते. या योजनेंतर्गत भारत सरकार ज्या कुटुंबांचे वार्षिक कौटुंबिक उत्पन्न आठ लाख किंवा त्यापेक्षा कमी आहे अशा कुटुंबातील विद्यार्थ्यांना कर्ज रक्कम प्रदान करते. उच्च शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रधानमंत्री विद्या लक्ष्मी योजनेचा फायदा होतो. उच्च शिक्षण घेत असताना देशातील गरीब विद्यार्थ्यांना येणाऱ्या आर्थिक अडचणी दूर करणे हे सरकारचे उद्दिष्ट आहे. प्रधानमंत्री विद्या लक्ष्मी योजनेंतर्गत केंद्र सरकार आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण घेण्यासाठी आर्थिक मदत करते. ज्यांच्या कुटुंबाचे एकूण वार्षिक उत्पन्न आठ लाख किंवा त्यापेक्षा कमी आहे अशा विद्यार्थ्यांना सरकार लाभ देते. या योजनेंतर्गत सरकारी संस्थांमध्ये तांत्रिक किंवा व्यावसायिक अभ्यासक्रम घेणाऱ्या विद्यार्थ्यांना सरकार प्राधान्य देईल. सरकार कर्जावर व्याज अनुदान देखील देते. दहा लाखांपर्यंतच्या शैक्षणिक कर्जासाठी, सरकार ३ टक्के व्याज अनुदान देते. साडेचार लाखांपर्यंतचे वार्षिक उत्पन्न असलेल्या कुटुंबांना संपूर्ण व्याज माफी मिळेल. प्रधानमंत्री विद्या लक्ष्मी योजनेसाठी अर्ज करण्यासाठी विद्यार्थ्यांनी https://www.vidyalakshmi.co.in/Students/ या विद्या लक्ष्मी ऑनलाइन पोर्टलला भेट द्यावी. त्यानंतर त्यांनी कॉमन एज्युकेशन लोन अर्ज फॉर्म भरावा. त्यांच्या गरजेनुसार कर्जासाठी अर्ज करावा. यानंतर कर्जासाठी अर्ज करणाऱ्या विद्यार्थ्यांना लाभ मिळतील.

# खोदकामावेळी दिसल्या पिशव्या; सोन्याने भरलेला खजिना सापडला

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

कधी–कधी व्यक्तीचे नशीब असे फिरते की ती झोपडीतून थेट महालात जाते. असेच काहीसे एका व्यक्तीसोबत घडले आहे. या व्यक्तीला घरासमोरील बागेत खोदकाम करताना सोन्याने भरलेला खजिना सापडला आहे. ज्याने त्याला कोट्यधीश बनविले आहे.



बऱ्याचदा असे होते, की अचानक एखाद्याला खूप मोठी लॉटरी लागते किंवा असा खजिना सापडतो ज्याचा त्याने कधी स्वप्नातही विचार केला नसेल. असे काहीसे फ्रान्स येथील एका व्यक्तीसोबत घडले आहे. ही व्यक्ती आपल्या बागेत खोदकाम करत असताना त्याला जमिनीखाली एक खजिना सापडला. हा एक खराखुरा खजिना होता. या गूढ खजिन्यात चक्क सोन्याचे बिस्किटे आणि नाणी सापडली आहेत. सोन्याची बिस्किटे आणि नाण्यांनी भरलेल्या पिशव्या जमिनीच्या आत पुरून ठेवण्यात आल्या होत्या. या खजिन्याने ही व्यक्ती क्षणात कोट्यधीश झाली आहे. बागेत स्विमिंग पूल बांधताना त्याला हा खजिना सापडला आहे. फ्रान्समध्ये एक व्यक्ती आपल्या घराच्या बागेत खोदकाम करत होता. तेवढ्यात त्याला सोन्याचा मोठा खजिना सापडून आला. जमिनीत अनेक पिशव्या पुरून ठेवलेल्या आढळून आल्या. या पिशव्यांमध्ये सोन्याची बिस्किटे आणि नाणी सापडून आली. खजिना सापडल्याने ही व्यक्ती क्षणात मालामाल झाली आहे. हे संपूर्ण सोने आता त्याच्या मालकीचे झाले आहे. तपास केल्यानंतर अधिकाऱ्यांनी हा खजिना त्या व्यक्तीच्या मालकीचा असल्याचा निर्णय घेण्यात आला. त्यामुळे अचानक ही व्यक्ती श्रीमंत झाली आहे. याबाबत असे सांगण्यात येते, की एका फ्रान्सच्या व्यक्तीला त्याच्या घराच्या बागेत स्विमिंग पूल बांधायचा होता. त्यामुळे त्याने बागेत खोदकाम सुरू केले. याचवेळी त्या व्यक्तीला जमिनीत काहीतरी दिसून आले. तेथे खूप साऱ्या पिशव्या पुरून ठेवलेल्या होत्या. जेव्हा त्याने या पिशव्या बाहेर काढल्या आणि उघडल्या तेव्हा त्याला आनंदाचा धक्काच बसला. कारण या पिशव्यांमध्ये त्याला सोन्याचा खजिना दिसून आला. या व्यक्तीला मिळालेल्या या सोन्याच्या खजिन्याची किंमत सात लाख यूरो म्हणजेच भारतीय चलनात तब्बल सात कोटी रुपये आहे.



# तुम्हीच व्हा..! पत्रकार

अनेकांना पत्रकार होण्याची सुप्त इच्छा असते. मात्र त्यासाठी काय करावे ? आपल्याला ते जमेल का ? आपल्याला लिहिता येईल का? सर्वच वृत्तपत्रांनी पुरेशा संख्येत त्यांचे अधिकृत प्रतिनिधी नेमले आहेत मग आपल्याला कोण संधी देईल?

ती संधी आम्ही आपणास उपलब्ध करून देत आहोत. खास करून आपल्या भागातील किंवा अमळनेर विधानसभा मतदारसंघातील कोणतीही समस्या, निधन वार्ता , विवाह वार्ता शक्यतो फोटोसह आम्हास लिहून कळवा. आपल्याला जसे लिहिता येईल तसे लिहा. त्यास आम्ही बातमीचे स्वरूप देऊ. त्याखाली वाचक पत्रकार म्हणून आपले नावही प्रसिद्ध करू. आपले नाव गोपनीय ठेवावे अशी आपली इच्छा असल्यास आपले नाव प्रसिद्ध केले जाणार नाही. बातमी चांगली असल्यास आपल्या फोटोसह प्रसिद्ध करू. आपणास लिहिण्याची इच्छा नसल्यास काही विषयांवर आम्हीच लिहावे, त्यास व्यापक प्रसिद्धी द्यावी असे आपणास वाटत असल्यास आम्हास आपण आपल्या मतदारसंघातील विषय ही सुचवू शकता. चला तर मग होऊया आपण पत्रकार. फोडू या समस्यांना वाचा. देऊयात चांगल्या कार्यांना प्रसिद्धी.

**बातमीसाठी संपर्क :**
रजनीकांत पाटील : 8788441234
योगेश महाजन : 9850576058
भरत पाटील : 9922408434

**जाहिरातीसाठी संपर्क :**
शरद कुलकर्णी: 9922547800
रजनीकांत पाटील : 8788441234

# एसडीएम छोटूलाल शर्मा पुन्हा वादाच्या भोवऱ्यात

## पत्नीला घराबाहेर काढल्याचा आरोप

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

राजस्थानातील जयपूर येथील प्रशासकीय सेवेतील अधिकारी एसडीएम छोटूलाल शर्मा हे पुन्हा एकदा चर्चेत आले आहेत. काही दिवसांपूर्वी भीलवाडा जिल्ह्यातील पेट्रोलपंप प्रकरणात कर्मचाऱ्याला चापट लगावण्याचा व्हिडिओ व्हायरल झाला होता. आता त्यांच्या कुटुंबीयांशी संबंधित आणखी एक गंभीर वाद उघड झाला आहे. मिळालेल्या माहितीनुसार छोटूलाल शर्मा यांनी त्यांच्या पत्नी पूनम शर्मा आणि मुलांना रात्री घराबाहेर काढल्याचा आरोप करण्यात आला आहे. पूनम शर्मा यांनी पोलिसांकडे तक्रार दाखल केली असून त्या सध्या आपल्या मुलांसह वणवण भटकत आहेत. दरम्यान, दुसरी महिला दीपिका व्यास हिने स्वतःला एसडीएम शर्मा यांची पत्नी असल्याचा दावा केल्याने प्रकरण अधिकच गुंतागुंतीचे बनले आहे. शंका निर्माण करणारी बाब म्हणजे हेच नाव (‘ दीपिका व्यास ’) अलीकडच्या पेट्रोलपंप वादात समोर आले होते. त्यावेळी तिनेच तक्रारीत ‘ आपले पती ’ छोटूलाल शर्मा यांच्याकडून गैरवर्तन झाल्याचा आरोप केला होता. त्याचवेळी सोशल मीडियावर पेट्रोलपंप घटनेचा व्हिडिओ प्रचंड व्हायरल झाला होता. सीसीटीव्ही फुटेजनुसार शर्मा प्रथम कर्मचाऱ्याला चापट मारताना दिसतात. नंतर कर्मचाऱ्याने प्रत्युत्तर दिले. या प्रकरणानंतर प्रशासनाने त्यांना निलंबित केल्याचे वृत्त आहे छोटूलाल शर्मा हे यापूर्वीही वादात अडकले आहेत. २०१७ मध्ये अधिकाऱ्यासोबत भांडण, २०१८ मध्ये लाचखोरीचे आरोप आणि आता या नव्या दोन्ही घटना. यामुळे त्यांची कारकीर्द सतत वादांच्या भोवऱ्यात राहिल्याचे स्पष्ट होते.

# देशात सर्वाधिक आयएएस ‘ या ’ राज्यातून!

## शेवटच्या ५ पैकी ४ यूपीएससी टॉपर याच राज्याचे

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

संघ लोकसेवा आयोगाची नागरी सेवा परीक्षा ही देशातील सर्वांत कठीण आणि प्रतिष्ठेची परीक्षा मानली जाते. देशातील सर्वोच्च प्राशासनिक अधिकारी या परीक्षेतून निवडले जातात. यामध्ये आयएएस, आयपीएस, आयआरएस, आयआयएस अशा अनेक पदांचा समावेश होतो. देशातील लाखो उमेदवार यूपीएससी परीक्षेची तयारी करत असतात. अनेक उमेदवार विना कोचिंग ही परीक्षा उत्तीर्ण होतात. तर देशात दिल्ली, लखनौ, मुंबई, पुणे, हैदराबाद, बेंगळुरू, चेन्नई अशा शहरांत मोठमोठ्या कोचिंग संस्था आहेत. आता ऑनलाईन कोचिंगमुळे देशातील कोणत्याही कोपऱ्यातून उमेदवार या परीक्षेची तयारी करू शकतात. देशात कोणत्या भागातून सर्वाधिक आयएएस, आयपीएस होतात? हा प्रश्न अनेकांना पडला असेल. सामान्य माहितीनुसार देशाच्या उत्तरेतील भागातून मोठ्या प्रमाणात उमेदवार ही परीक्षा उत्तीर्ण होताना दिसतात. कारण देशातील सर्वांत जास्त कोचिंग सेंटर हे राजधानी दिल्लीत आहेत. त्यामुळे तेथे अनेक जण जाऊन तयारी करत असतात. बऱ्याच जणांना वाटत असेल, की बिहारमधून सर्वाधिक अधिकारी होतात. यामध्ये काही प्रमाणात तथ्य आहे पण गेल्या काही वर्षांपासून उत्तरेतीलच एका राज्याने बिहारला मागे टाकले आहे. गेल्या पाच वर्षांतील टॉपरचा विचार केला तर सर्वाधिक वेळा या राज्याने बाजी मारली आहे. चला तर जाणून घेऊया या राज्याबद्दल...

**कोणत्या राज्यातून सर्वाधिक अधिकारी?**

मागील पाच वर्षांतील चार यूपीएससी परीक्षेतील टॉपर उत्तर प्रदेशचे असल्याने बिहारच्या आयएएस निर्मितीच्या मिथकाला धक्का बसला आहे. उत्तर प्रदेशची मोठी लोकसंख्या, सरकारी सेवेला असलेले सांस्कृतिक महत्त्व आणि प्रयागराज व लखनौसारखी कोचिंग केंद्रे यामुळे हे यश मिळाले आहे. बिहारची आयएएस अधिकारी घडविणारी प्रतिष्ठा दंतकथा बनली असली, तरी आकडेवारीनुसार उत्तर प्रदेशने बाजी मारली आहे. यूपीएससी परीक्षा ही भारतातील सर्वांत कठीण परीक्षांपैकी एक मानली जाते. अनेक वर्षांपासून सर्वाधिक आयएएस अधिकारी बिहारमधून येतात, अशी एक सर्वमान्य समजूत आहे. बिहारची ही प्रतिष्ठा अविश्वसनीय दृढनिश्चयाच्या कथांनी अधिकच वाढली आहे. परंतु जर ही सामान्य समजूत प्रत्यक्षात एक मिथक असेल तर? वास्तविक उत्तर तुम्हाला आश्चर्यचकित करू शकते. बिहारचे योगदान मोठे आणि प्रेरणादायी असले, तरी आकडेवारी एक वेगळाच विजेता दर्शविते.

### हे कसे घडले?

यामागील कारणे या खुलाशांइतकीच आकर्षक आहेत. उत्तर प्रदेशचे यश हे मोठ्या लोकसंख्येमुळे निर्माण झालेली प्रतिभेची मोठी खाण आणि सरकारी सेवेला खोलवर महत्त्व देणारे सांस्कृतिक वातावरण यांच्या शक्तिशाली संयोजनातून आले आहे. याव्यतिरिक्त प्रयागराज आणि लखनौसारखी शहरे प्रमुख कोचिंग केंद्रे म्हणून विकसित झाली आहेत. राज्याची दिल्लीशी जवळीक राजधानीतील विस्तृत तयारी संसाधनांमध्ये सुलभ प्रवेश प्रदान करते.

ग्लोबल महातेज
आजच...! आपली जाहिरात बुक करा
दैनिक ग्लोबल महातेज उपलब्ध करून देत आहे आपणास
‘ चमकण्याची ’ तसेच आपली व्यक्तिगत, राजकीय, व्यावसायिक प्रसिद्धी जाहिरात रूपाने प्रचंड मोठ्या प्रमाणावर करण्याची सुवर्णसंधी...!





**जाहिरात दर**

| | | |
|---|---|---|
| १) | पूर्ण पान | 45,000/- रु. |
| २) | अर्ध पान | 25,000/- रु. |
| ३) | पाव पान (16 x 25 सें. मी.) | 13,000/- रु. |
| ४) | 16 x 13 सें. मी. | 7,000/- रु. |
| ५) | 12 x 10 सें. मी. | 4,000/- रु. |
| ६) | 8 x 10 सें. मी. | 2,500/- रु. |
| ६) | ३ वर्षांखालील बाळाचा वाढदिवस | 200/- रु. |
| ७) | शुभविवाह जाहिरात ( वधू-वराच्या रंगीत फोटोसह ) | 300/- रु. |
| ८) | लिगल नोटीस | 150/- रु. |
| ९) | उठावणा जाहिरात | मोफत |

* फ्रंट पेज साठी जाहिरात २०% जादा दर असेल. * शेवटच्या पानासाठी १०% जादा दर असेल.

रोज साडेतीन हजार पेपरचा खप असलेले ब्रॉडशिट आकारातील चारही पाने रंगीत असलेले महाराष्ट्रातील एकमेव वृत्तपत्र ...!! डिजिटल पेपरच्या सहाय्याने लाखो लोकांपर्यंत पोहोचणारा अफलातून पेपर...!!!

जाहिरात बुकिंगसाठी संपर्क
शरद कुलकर्णी : 99225 47800/95271 08678
रजनीकांत पाटील : 87884 41234
वरील सर्व दरांत नियमित जाहिरातदारांना विशेष सवलत मिळेल व बातम्यांच्या स्वरूपात मोठी प्रसिद्धी मिळेल.







द्वादशी संपल्यावर जी रात्र येते (दोन्ही पक्षामध्ये) त्याला प्रदोष म्हणतात. **प्रदोष चार प्रकारचे** असतात.

१) सोम प्रदोष
सोमवारी येणारा प्रदोष
२) भौम प्रदोष
मंगळवारी येणारा प्रदोष
३) शनी प्रदोष
शनिवारी येणारा प्रदोष
४) पक्ष प्रदोष
इतर वारी येणारा प्रदोष

या सर्वांमध्ये पक्ष प्रदोष हा अधिक महत्त्वाचा आहे. प्रदोष या शब्दाचा अर्थ बघता प्र म्हणजे प्रकर्षणयुक्त, अतिशय लक्षणीय व दोष म्हणजे दुर्गुण, पाप होय. म्हणजेच ज्यावेळेस एखादा दोष किंवा पाप अतिशय प्रखर असते त्यावेळेस त्याची गणना प्रदोषात होते. अशा वेळी तो दोष जाण्यासाठी तितकीच प्रभावी उपाययोजना करणे महत्त्वाचे असते. म्हणून त्यासाठी प्रदोष व्रत हा एक अतिशय खात्रीशीर उपाय आहे.

१) सोम प्रदोष
पारमार्थिक, आध्यात्मिक आणि पार लौकिक श्रेय प्राप्त करण्यासाठी हे व्रत करतात.

२) भौम प्रदोष
आर्थिक समस्या, ऐहिक स्थिती सुधारण्यासाठी हे व्रत करतात.

३) शनी प्रदोष
संततीविषयक सर्व समस्या सुटण्यासाठी हे व्रत करतात.

४) पक्ष प्रदोष
हा सर्वसमावेशक आहे. हे व्रत केल्यामुळे मानवाच्या धनधान्य, पुत्रपोत्रादी समस्या, अनेक ऐहिक कामना पूर्ण होतातच. पण मुक्तीसाठी आवश्यक ती भक्ती, साधना, साक्षात्कार याही गोष्टी या व्रतामुळे साध्य होतात. शिवाय कायिक, वाचिक, मानसिक, सांसर्गिक इत्यादी अनेक प्रकारची दुरीते या व्रतामुळे समूळ नष्ट होतात. पण विविध प्रकारच्या सिद्धी यामुळे प्राप्त होतात. प्रदोष व्रताचे महत्त्व व पद्धत सोदाहरण वेदतुल्य श्री गुरुचरित्र या महान ग्रंथात दिलेले आहे. श्रद्धा, भक्तिभाव, नियमितता यामुळे अमूल्य असे फळ या व्रताने मिळते. केलेली सेवा, निष्ठा वाया जात नाही. फक्त श्रद्धेबरोबर सबुरी हवी.

# विष्णुदास आणि सम्राट चोल



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अनेक वर्षांपूर्वी कांचीपुरीत चोल नावाचा राजा होऊन गेला. त्याच्या राज्यात सर्व जण सुखी होते. कुणीही गरीब, पापी आणि रोगी नव्हता. एकदा राजा चोल अनंतशयन नावाच्या तीर्थस्थळी गेला. भगवान विष्णू यांच्या दिव्य स्वरूपाची पूजा केली. राजा चोल याने हिरे, मोती आणि सोन्याची फुले भगवान विष्णू यांच्या चरणी वाहिली आणि तो पूजा करायला बसला. तेव्हा विष्णुदास नावाचा एक ब्राह्मण हातात पाणी, तुळशीच्या मंजुळा घेऊन आला आणि भगवान विष्णू यांची पूजा करू लागला. राजा चोल याने भगवान विष्णू यांच्या चरणी जी हिरे, मोती आणि सोन्याची फुले वाहिली होती ती विष्णुदासाने अर्पण केलेल्या तुळशीच्या मंजुळामुळे झाकली गेली. हे पाहून राजा चोल संतापून म्हणाला, ‘‘ विष्णुदास, तू अगदीच अडाणी आणि मूर्ख आहेस. देवाची भक्ती कशी करावी हेही तुला माहीत नाही. मी अर्पण केलेल्या हिरे-मोत्यामुळे भगवान विष्णू यांची शोभा किती वाढली होती; पण तू त्याला तुळशीच्या मंजुळांनी झाकून टाकले.’’

विष्णुदास भगवान विष्णू यांचा परमभक्त होता. तो म्हणाला, ‘‘ राजा, तुम्हाला भक्तीबद्दल काहीच ज्ञान नाही. फक्त राजलक्ष्मीच्या अभिमानामुळे तुम्ही माझा अपमान केला आहे.’’ विष्णुदासाचे बोलणे ऐकून राजा चोल हसत म्हणाला, ‘‘ निर्धन असल्यामुळे तुझी भगवान विष्णू यांच्यावर किती भक्ती आहे, हे कळतेच आहे. भगवान विष्णू यांना प्रसन्न करण्यासाठी तू दानही करत नाही आणि यज्ञही करत नाही. तू तर आतापर्यंत देवमंदिरही बनविले नाही. मग आपल्या भक्तीवर एवढा अभिमान का करतोस?’’ मंदिरात असलेल्या दुसऱ्या ब्राह्मणांच्या समोर राजा चोल म्हणाला, ‘‘ जो पहिल्यांदा भगवान विष्णू यांचे दर्शन घेईल तोच खरा भक्त म्हटला जाईल.’’ एवढे म्हणून राजा चोल राजमहालात परत आला आणि महर्षी मुदगल यांना आचार्य बनवून वैष्णव यज्ञ सुरू केला. दुसरीकडे विष्णुदासही मंदिरात बसून व्रत, एकादशी व्रत, ॐ नमो भगवते वासुदेवाय मंत्राचा जप, नृत्य-गीत आयोजन इत्यादी गोष्टी करून भगवान विष्णू यांची पूजा करू लागला. विष्णुदास झोपलेला असताना, जागा असताना, चालता-फिरता भगवानाचेच स्मरण करू लागला.

विष्णुदास आणि राजा चोल या दोघांचीही सगळी इंद्रिये आणि सगळे कार्य भगवान विष्णू यांना समर्पित झाले होते. दोघांनीही खूप काळ भगवान विष्णू यांची आराधना केली. एके दिवशी पूजा-पाठ आणि नित्यकर्म झाल्यानंतर विष्णुदासाने जेवण तयार केले; पण कुणीतरी त्यांचे अन्न चोरून नेले. जर विष्णुदासाने दुसऱ्यांदा स्वयंपाक केला असता तर त्याला सायंकाळच्या पूजेसाठी वेळ राहिला नसता आणि त्याचा पूजेचा नियम भंग झाला असता. अशा प्रकारे सात दिवस कुणीतरी त्यांनी केलेले अन्न चोरून नेत होते आणि त्यांना उपाशीच राहावे लागत होते.

एक दिवस विष्णुदासाने विचार केला, की जर दुसऱ्यांदा स्वयंपाक केला तर माझी सायंकाळाची पूजा भंग होते आणि देवाला नैवेद्य दाखविल्याशिवाय मी जेवण करू शकत नाही. आज माझ्या उपवासाला सात दिवस झाले आहेत. या व्रतात मी किती दिवस स्थिर राहू शकतो, ते बघूया. दुसऱ्या दिवशी विष्णुदास स्वयंपाक बनवून लपून उभा राहिला. त्याने पाहिले, की अस्पृश्य अन्न चोरून पळत आहे. त्याचे शरीर भुकेमुळे फार अशक्त झाले होते. त्याच्या शरीरात हाडांशिवाय दुसरे काहीच नव्हते. त्या अस्पृश्याला पाहिल्यानंतर त्याचे मन करुणेने भरले. अस्पृश्य विष्णुदासला पाहून पळू लागला. भुकेमुळे तो बेशुद्ध होऊन जमिनीवर पडला. विष्णुदास पळतच त्या अस्पृश्याजवळ आला आणि पंख्याने त्याला हवा घालू लागला. विष्णुदासाने पाहिले, की अस्पृश्याच्या जागी शंख, चक्र, गदा धारण केलेले साक्षात भगवान विष्णू त्याच्यासमोर उभे आहेत. आपल्यासमोर साक्षात भगवान विष्णू यांना उभे राहिलेले पाहून तो आश्चर्यचकित झाला. भगवान विष्णू यांनी त्याची गळाभेट घेतली आणि आपले रूप त्याला दिले. त्याला घेऊन वैकुंठाला निघून गेले. यज्ञात बसलेल्या राजा चोल याने भगवान विष्णू एका सुंदर विमानात विष्णुदासाला बसवून घेऊन जात आहेत हे पाहिले.

महर्षी मुदगल यांना राजा चोल म्हणाला, ‘‘ मी विष्णुदासाचा मत्सर करून यज्ञ, दान, होम हे सगळे केले. ब्राह्मणांना दान देऊन त्यांची इच्छा पूर्ण केली; पण भगवान विष्णू प्रसन्न झाले नाहीत. ते विष्णुदासच्या भक्तीवर प्रसन्न होऊन त्याला आपले स्वरूप दाखवून आपल्याबरोबर वैकुंठाला घेऊन जात आहेत.’’ भगवान विष्णू दान, यज्ञ, हवन इत्यादीने प्रसन्न होत नाही यावर राजा चोलचा विश्वास बसला. देवाच्या दर्शनासाठी भक्तीच प्रमुख आहे. राजा चोल याने आपल्या भाच्याच्या हाती राज्यकारभार सोपविला. यज्ञकुंडासमोर उभा राहून तो जोरात म्हणाला, ‘‘देवा, मला तुझी खरी भक्ती प्रदान कर.’’ देवाला खऱ्या भक्तीची प्रार्थना करीत राजा चोल याने अग्नीत उडी घेतली. त्याचवेळी यज्ञातील अग्नीतून साक्षात भगवान विष्णू प्रकट झाले आणि त्यांनी राजा चोल याला आलिंगन देऊन एका दिव्य विमानात बसवून त्यालाही वैकुंठधामाला घेऊन गेले. विष्णुदास आणि राजा चोल यांच्या भक्तीने प्रसन्न होऊन भगवान विष्णू यांनी त्यांना आपले स्वरूप देऊन विष्णुलोकाचे द्वारपाल बनविले. दोन्ही भक्त भगवान विष्णू यांच्या दिव्यशक्तीच्या प्रभावाने जन्म-मरणाच्या बंधनातून नेहमीसाठीच मुक्त झाले.

# कर्पूर होम



घरात छोटेसे यज्ञकुंड असावे. जेव्हा मन अशांत असेल, तर घरात उगाच अडचणी येतात. तेव्हा घरात आपला आपण छोटासा होम करावा. शिवकवच स्त्रोत्र म्हणावे. कर्पूर होम केल्याने घरातील नकारात्मकता दूर होते. देवतांना प्रसन्न करण्यासाठी होमाचे अनेक प्रकार आपल्याकडे सांगितले आहेत. यामधील एक ‘ कर्पूर होम ’ हा तंत्रशास्त्रातील प्रभावशाली होम आणि विधी आहे. यामध्ये शेंडी ठेवून सोललेल्या नारळावर कापडाची वडी प्रज्वलित केली जाते. पहिली वडी संपताच दुसरी वडी ठेवावी. अशा प्रकारे कापराची ज्योत तेवत ठेवावी. कर्पूरहोम करताना हरिद्वार येथील ब्रह्मकुंडावर बसलो आहोत असा विचार केला जातो. नारळातील पाण्याचा बाहेरील वातावरणाशी संपर्क येत नाही. त्यामुळे ते गंगेप्रमाणेच शुद्ध, प्रदूषणरहित, स्फटिकासारखे शुद्ध आणि पवित्र असते, तर नारळाचे कवच म्हणजे हरिद्वारच्या ब्रह्मकुंडाचा काठ मानला जातो. तेथे यज्ञ केल्यावर जेवढे फळ मिळते तेवढेच फळ कर्पूर होमाचे मिळते. कारण हा होम करताना परमपावन अशा अग्नीचा संयोग होतो. त्यातून निर्माण होणारी स्पंदने मनाची संवेदनशीलता वाढवतात. त्यामुळे मनाची एकाग्रता वाढून इच्छाशक्ती तीव्र होते. या इच्छाशक्तीच्या बळावर मनोकामना पूर्ण होण्यास सहाय्य होते. अनामिक मन:शांती मिळते.

कर्पूर होम करताना

कर्पूर होम करताना मंत्र किंवा स्तोत्र म्हटले नाही तरी चालते. मात्र अशा वेळी आपल्या सद्गुरूंचे किंवा इष्ट देवतेचे नामस्मरण, मंत्रजप किंवा स्तोत्र पठण जर कर्पूराच्या अग्नीसमोर केले तर त्याचे मिळणारे फळ वाढते. एकाच नारळावर हव्या तितक्या प्रमाणात कापूर जाळता येतो. त्यामुळे नारळ जळत नाही. काही दिवसांनी नारळातील पाणी आटते किंवा तो सुकून जातो. अशावेळी अमावास्या किंवा पौर्णिमेला नारळ बदलावा. नारळ तडकला, फुटला तरीही नारळ कचऱ्यात न टाकता त्याचे वाहत्या पाण्यात विसर्जन करावे आणि नवा नारळ घ्यावा. देवाकडून आशीर्वाद हवा असेल तर नारळाची शेंडी देवाकडे करावी. मात्र आत्मनिवेदन, ध्यानधारणा, त्राटक करताना शेंडी स्वत:कडे ठेवावी. जात, धर्म, लिंग, वय, अशौच असा कोणताही अडथळा कर्पूर होम येत नाही. संकटकाळी हातपाय धुऊन किमान केलेली शारीरिक शुचिता कर्पूर होमास पुरेशी ठरते.

**घरात शांती लाभते**

घर खरेदी करायचे असेल तर एकदम दोन-तीन चांगली घरे दृष्टिपथात येतात किंवा उपवर मुलीला एकाच वेळी तीन-चार चांगली स्थळे येतात. तसेच एकाच वेळी अनेक ठिकाणांहून नोकऱ्यांची नेमणूक पत्रे येतात. अशा वेळी नेमकी निवड कशी करावी, अशी द्विधा मन:स्थिती निर्माण होते. तेव्हा या पेचप्रसंगी कर्पूर होमासारखा पर्याय नाही.

**समस्यांचे निराकरण**

कधी-कधी कर्पूर होमावेळी नारळ तडकतो अशावेळी लगेच दुसरा नारळ घेऊन कर्पूर होम करावा. एखादे स्तोत्र वा ठराविक संख्येचा जप चालू असताना नारळ तडकला तर ते स्तोत्र वा जप पूर्ण करून नारळ बदलावा. तडकलेला नारळ खाण्यास योग्य असेल, तर त्याचा घरात वापर करावा, नाहीतर विसर्जित करावा. काही वेळा कर्पूर होम सुरू असल्यास नारळातून पाणी येऊ शकते.

## कर्पूर होमाचे फायदे

रोज सकाळी आणि सायंकाळी कर्पूर होम करावा. यामुळे घरात शांतता लाभायला मदत होते. महत्त्वाच्या कामाला निघण्यापूर्वी कर्पूर होम केला जातो. कारण बऱ्याचदा कसोटीचे प्रसंग येतात, बुद्धी चालेनाशी होते, निर्णय घेणे जड जाते. अशा वेळी कर्पूर होम केल्यास फायदा होतो. कर्पूर होम केल्यानंतर थोडा वेळ शांत बसावे. त्यामुळे मन स्थिर होते. परिस्थिती अनुकूल होण्यास मदत होते.

## केव्हा आणि कसा करावा?

कर्पूर होम कोणत्याही वेळी करता येतो. मात्र, दररोज ठराविक वेळी केल्यास आवाहन केलेली देवता त्याचवेळी उपस्थित असल्याचे जाणवते. ज्यावेळी शोक, दु:खाची भावना उफाळून येते. मन हताश होते त्यावेळी कर्पूर होम केल्यास नैराश्य दूर पळते. मनाला उत्साह जाणवू लागतो. फलनिष्पत्ती होईपर्यंत एकाच नारळावर कर्पूर होम करता येतो. नारळावर एकाच जागी कापूर लावण्याऐवजी जागा बदलली तरी चालते. त्यामुळे एकच नारळ त्यातील पाणी संपेपर्यंत वापरता येतो. काही दिवसांनी पाणी आटल्यावर तसेच अमावास्या, पौर्णिमा या तिथींनी नारळ भग्न पावल्यास त्या जागी नवीन नारळ घ्यावा. पहिला नारळ प्रसाद म्हणून भक्षण करता येतो. नारळ नासला असेल तर विसर्जित करावा. समस्यांवरील सर्वांत प्रभावी उपाय म्हणजे ललिता सहस्त्रनाम स्तोत्र.

# व्यंकटेश स्तोत्र मंडळ म्हणजे काय?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



व्यंकटेश स्तोत्र मंडळ म्हणजे श्री व्यंकटेश स्तोत्राचे २१ वेळा पठण करणे. हे स्तोत्र भगवान विष्णू यांना समर्पित आहे. स्तोत्र मंडळ २१ दिवस चालते. दररोज सकाळी किंवा रात्री एकाच वेळी २१ वेळा स्तोत्र पठण केले जाते. स्तोत्र पठण करताना काही नियम पाळणे आवश्यक आहे. जसे- उपवास, ब्रह्मचर्य आणि शांतता. स्तोत्र मंडळ पूर्ण केल्याने इच्छापूर्ती, पापक्षय आणि मोक्षप्राप्ती होते.

## व्यंकटेश स्तोत्र मंडळ कसे करावे?

व्यंकटेश स्तोत्राचे मंडळ म्हणजेच पारायण करताना काही नियम आणि पद्धती आहेत. व्यकटेशाची कृपा होण्यासाठी आणि त्यांचा कृपाशीर्वाद आपल्यावर राहण्यासाठी या नियमांचे पालन आणि पद्धतीचे अवलंब करणे खूप आवश्यक आहे.

## नियम आणि पद्धत

अष्टमी, एकादशी, चतुर्थी आणि दशमी हे दिवस स्तोत्र मंडळासाठी उत्तम मानले जातात. मंगळवार, गुरुवार आणि शुक्रवार हे दिवसही चांगले आहेत. स्तोत्र मंडळ रात्री बारा वाजता सुरू करणे उत्तम मानले जाते. १२ वाजेच्या आधी नाही आणि बारा वाजेनंतर नाही.

